# कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) : मानव्यशास्त्रांचे प्रतिबिंब – एक ऐतिहासिक अध्ययन

**Dr. Chandu R. Deshpande**
Asst. Professor, Dept of History,
Nabira Mahavidyalaya, Katol
Email : chandud234@gmail.com
Mob.No. : 8275288112

Crossref DOI - https://doi.org/10.63665/rh.v7i2.120

---

**सारांश *(Abstract)* :**

*भटकंती अवस्थेत असणाऱ्या मानवाने टप्प्याटप्प्याने ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञानात प्रगती करत आज कृत्रिम बुद्धिमत्तेमध्ये एक ऐतिहासिक क्रांती केलेली आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) ही केवळ आधुनिक तांत्रिक साधन नाही तर मानवी समाज, संस्कृती, इतिहास, साहित्य, तत्त्वज्ञान आणि नैतिकतेचे प्रतिबिंब आहे. मानव्यशास्त्र मानवाच्या अनुभव, मूल्ये, संस्कृती आणि सामूहिक स्मृतीचा अभ्यास करते. हे संशोधन AI ला मानव्यशास्त्राचा आरसा म्हणून अभ्यासताना त्याचा ऐतिहासिक विकास, मानव्यशास्त्राशी परस्परसंबंध, नैतिक अडचणी, सामाजिक परिणाम आणि भविष्य यांचा सखोल विचार करतो. AI  मानवी ज्ञान, भाषा आणि सांस्कृतिक ढाच्यावर आधारित असल्यामुळे त्यातून मानवी समाजातील गुण-दोष स्पष्ट होतात.*

*इतिहास हा मानवी अनुभवांचा सातत्यपूर्ण प्रवास असून मानव्यशास्त्राच्या माध्यमातून तो समजून घेतला जातो. AI अनुभवांचे विश्लेषण, संकलन आणि पुनर्रचना करण्याचे प्रभावी साधन ठरत असले तरी मात्र AI ही मानवी संवेदनशीलता, नैतिकता, भावना आणि ऐतिहासिक संदर्भ यांची जागा घेऊ शकत नाही. त्यामुळे इतिहास आणि AI यांच्यातील नाते हे फक्त सहकार्याचे असावे, अधीनतेचे नाही, हा या संशोधनाचा मुख्य भाग आहे.*

*AI  केवळ यंत्रणा नसून मानवी विचार, नैतिकता आणि सामाजिक स्मृतीची डिजिटल प्रतिमा आहे. मानव्यशास्त्राचा ऐतिहासिक विकास, AI चा उदय, इतिहास व संस्कृतीवरील त्याचा प्रभाव, सामूहिक स्मृतीची संकल्पना आणि इतिहासकाराची नैतिक जबाबदारी या मुद्द्यांचा सखोल विचार करण्यात आला असून AI च्या मर्यादा, आव्हाने, यश–अपयश आणि पर्यायी उपाययोजना यांचे इतिहासकेंद्री मूल्यमापन करण्यात आलेले आहेत. हा लेख आंतरशाखीय संशोधनासाठी महत्त्वपूर्ण दृष्टीकोन प्राप्त करून देतो. तर इतिहासशास्त्र आणि तंत्रज्ञान यांच्यातील संवाद अधिक सशक्त करण्याचा प्रयत्न करतो.*

**बिजशब्द (Keywords) :** कृत्रिम बुद्धिमत्ता, मानव्यशास्त्र, नैतिकता, इतिहास, संस्कृती, डिजिटल समाज, मानवी मूल्ये.

---

**प्रस्तावना (Introduction) :**

पृथ्वीवर मानवाने टप्प्याटप्प्याने कंदमुळे खाता खाता अग्निचा, अवजार शोध सोबत शेती, पशुपालन करत कुटुंब, समाज, देश व जगाची निर्मिती केली याची साक्ष प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक इतिहास देतो. अर्थात मानवाने आपल्या बुद्धीच्या जोरावर संक्रमण व सामाजिक परिवर्तन घडवून आणले. पाहता पाहता वसाहतवाद, व्यापारवाद, वाणिज्यक्रांतीला चालना देत कृषीक्रांती आणि औद्योगिक क्रांती घडून आणली. आणि ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञानात उंच भरारी घेतली. आधुनिक कालखंडात मानवाने संगणक शोधून काढले आणि त्यातही प्रगती करून कृत्रिम बुद्धीमत्ता प्रणाली आणली. आज २१ व्या शतकात AI मानवाच्या जीवनातील प्रत्येक क्षेत्रात प्रवेश करत आहे. शिक्षण, आरोग्य, प्रशासन, संशोधन, कला, साहित्य आणि इतिहास लेखन यावर प्रभाव पडलेला दिसतो. पारंपरिक दृष्टिकोनातून AI ही तांत्रिक प्रणाली मानली गेली, परंतु आता तिचा मानव्यशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास अतिशय महत्वाचा ठरला आहे. AI मानवी ज्ञान, भाषा, अनुभव आणि सांस्कृतिक माहितीवर आधारित असल्यामुळे ती मानव्यशास्त्राचे प्रतिबिंब/प्रतिमा/आरसा ठरते. या संशोधनात AI आणि मानव्यशास्त्र यांचे परस्परसंबंध, नैतिक, मूल्ये आणि सामाजिक परिणाम यांचा सखोल विचार केला आहे.

**अर्थ, स्वरूप व व्याप्ती :**

‘AI as a Mirror of Humanities’ म्हणजे AI ही मानवी ज्ञान, अनुभव व सांस्कृतिक वारशाचे प्रतिबिंब होय. AI चे स्वरूप हे मानवाने दिलेल्या माहितीवर, मूल्यांवर व ऐतिहासिक दस्तऐवजांवर आधारित असते. त्यामुळे तिचे निष्कर्ष मानवी विचारसरणीवरच आधारित आहेत. या संशोधनाची व्याप्ती मानव्यशास्त्राच्या विविध शाखांपर्यंत विस्तारलेली असल्याने इतिहास, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, भाषा, साहित्य, गृहअर्थशास्त्र, मानसशास्त्र व सांस्कृतिक अध्ययन या क्षेत्रांमध्ये AI चा वापर कसा होत आहे, याचा विचार येथे करण्यात आलेला आहे. तसेच AI मुळे संशोधन पद्धतींमध्ये झालेल्या बदलांचा, नैतिक प्रश्नांचा व भविष्यातील परिणामांचा अभ्यास या लेखात अंतर्भूत आहे. हा अभ्यास केवळ तांत्रिक मर्यादेत न राहता मानवी मूल्ये व सामाजिक जबाबदारी यांचा विचार करतो. त्यामुळे या संशोधनाचा उपयोग इतिहासकार, समाजशास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, प्रशासक व धोरणकर्त्यांसाठी उपयुक्त ठरू शकतो.

**संशोधन पद्धती आणि उद्दिष्टे :**

या संशोधनासाठी ऐतिहासिक, विश्लेषणात्मक व तुलनात्मक पद्धतींचा अवलंब करण्यात आला आहे. प्राथमिक व दुय्यम स्रोतांचा अभ्यास करून AI व मानव्यशास्त्रातील संबंध स्पष्ट करण्यात आलेले आहेत.

**उद्दिष्टे :**

1. AI चा मानव्यशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करणे.
2. AI इतिहासकाराची भूमिका समजावून घेणे.
3. AI मुळे निर्माण होणारे धोके व उपाय सुचविणे.

**मर्यादा (Limitations of the Study) :**

AI आणि मानव्यशास्त्राच्या अभ्यासाला काही मर्यादा आहेत. AI मानवी भावना, सहानुभूती व नैतिक संवेदना पूर्णतः समजू शकत नाही. तसेच उपलब्ध डेटा अपूर्ण किंवा पक्षपाती असल्यास निष्कर्ष दिशाभूल करणारे असू शकतात. ऐतिहासिक संदर्भ व काल सुसंगतता समजण्यात AI ला मर्यादा आहेत. या अभ्यासात प्रामुख्याने सैद्धांतिक व विश्लेषणात्मक दृष्टिकोन वापरण्यात आल्याने प्रायोगिक उदाहरणांची मर्यादा दिसते. त्यामुळे भविष्यात अधिक क्षेत्रीय व तुलनात्मक संशोधनाची गरज अधोरेखित होते.

**मानव्यशास्त्राचा ऐतिहासिक विकास :**

मानव्यशास्त्राचा उगम प्राचीन संस्कृतींमध्ये आढळतो. ग्रीक तत्त्वज्ञ, भारतीय ऋषी व चिनी विचारवंतांनी मानवकेंद्रित विचार मांडले. मध्ययुगात धार्मिक दृष्टिकोन प्रभावी होता, तर आधुनिक काळात विवेकवाद व मानवतावाद पुढे आला. औद्योगिक क्रांतीनंतर समाज, संस्कृती व इतिहासाचा वैज्ञानिक अभ्यास सुरू झाला. 20 व्या शतकात संरचनावाद, उत्तरआधुनिकता व सांस्कृतिक अध्ययनामुळे मानव्यशास्त्र अधिक व्यापक झाले. आज डिजिटल युगात AI मुळे मानव्यशास्त्राला नवे साधन व नवी दिशा मिळाली आहे.

**AI चा ऐतिहासिक विकास :**

AI म्हणजे संगणक प्रणाली जी मानवी बुद्धिमत्तेसारखी विचार करण्याची, शिकण्याची, निर्णय घेण्याची आणि समस्या सोडविण्याची क्षमता दर्शविते. १९५६ मध्ये जॉन मॅकार्थी यांनी AI ही संज्ञा प्रथम वापरली. सुरुवातीला AI संशोधन गणित, तर्कशास्त्र आणि संगणकशास्त्रावर आधारित होते. १९७० नंतर तज्ज्ञ प्रणाली, १९९० नंतर मशीन लर्निंग आणि २१व्या शतकात डीप लर्निंग व जनरेटिव्ह AI यांचा विकास झाला. या सर्व टप्प्यांमध्ये मानवी ज्ञान, भाषा आणि अनुभव AI मध्ये प्रतिबिंबित झालेले आहेत.

**AI व इतिहासातील सत्यता :**

इतिहास लेखनात सत्यता व विश्वसनीयता हे मूलभूत निकष मानले जातात. AI साधने मोठ्या प्रमाणावर माहिती संकलन करतात. परंतु ती माहिती मूळ स्रोतांवर कितपत आधारित आहे, हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. AI कधीकधी अपूर्ण किंवा पक्षपाती डेटावर निष्कर्ष काढू शकते. त्यामुळे ऐतिहासिक सत्यता टिकवण्यासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांची तपासणी, तुलनात्मक अभ्यास आणि मानवी विवेक आवश्यक आहे. AI हे सहाय्यक फक्त साधन ठरू शकते. परंतु अंतिम ऐतिहासिक निर्णय इतिहासकाराच्याच चिकित्सक बुद्धीवर अवलंबून राहतो.

**AI व इतिहासलेखन पद्धतींतील बदल :**

AI च्या आगमनामुळे इतिहास लेखनाच्या पद्धतींमध्ये मूलभूत परिवर्तन झाले आहे. पूर्वी इतिहासकार मर्यादित स्रोतांवर आधारित संशोधन करीत असत, तर AI मुळे मोठ्या प्रमाणात माहितीचे विश्लेषण शक्य झाले आहे. कालानुक्रम, नमुना शोध व तुलनात्मक अभ्यास अधिक वेगाने करता येतो. त्यामुळे इतिहास लेखन अधिक

व्यापक व बहुआयामी बनले आहे. परंतु AI आधारित पद्धतींमध्ये मानवी अनुभव, भावनिक संदर्भ व नैतिक निर्णयांची कमतरता जाणवते. म्हणून नव्या इतिहास लेखनात AI व मानवी इतिहासकार समन्वय महत्वाचा आहे.

**AI इतिहासकार : नैतिकता व मूल्ये :**

AI इतिहासकार ही संकल्पना इतिहास संशोधनात नवी आहे. AI ऐतिहासिक माहितीचे विश्लेषण करू शकते. मात्र तिच्या निष्कर्षांमध्ये नैतिकता व मूल्यांचा अभाव आढळून येतो. AI मानवी संवेदना समजू शकत नाही. त्यामुळे इतिहासाचे मानवीकरण करण्याचा धोका निर्माण होतो. इतिहास लेखनात मानवी विवेक, सहानुभूती व मूल्यदृष्टी आवश्यक असल्याने AI ला फक्त सहाय्यक म्हणून वापर करावा.

**संकल्पनात्मक अभ्यास :**

AI व मानव्यशास्त्र यांचा अभ्यास संकल्पनात्मक चौकटीतून केल्यास या विषयाचे ऐतिहासिक व तात्त्विक स्वरूप अधिक स्पष्ट होते. मानवतावाद, विवेकवाद, उत्तरआधुनिकता आणि डिजिटल ह्युमॅनिटीज या विचारप्रवाहांच्या पार्श्वभूमीवर AI चा विकास समजून घेता येतो. मानव्यशास्त्र मानवाच्या अनुभवांना केंद्रस्थानी ठेवते, तर AI त्या अनुभवांचे विश्लेषण करते. त्यामुळे AI ही केवळ तांत्रिक नव्हे, तर वैचारिक रचना आहेत. इतिहास, संस्कृती, मूल्ये व ज्ञाननिर्मिती यांच्यातील परस्परसंबंध स्पष्ट करून AI च्या मर्यादा व शक्यता समजून घेण्यास संकल्पनात्मक चौकट उपयुक्त ठरते.

**AI व Digital Humanities :**

डिजिटल ह्युमॅनिटीज या नव्या अभ्यासशाखेमुळे मानव्यशास्त्रात तांत्रिक साधनांचा वापर वाढलेला दिसून येतो. AI ही डिजिटल ह्युमॅनिटीजचा महत्त्वपूर्ण घटक असून तो ऐतिहासिक दस्तऐवजांचे डिजिटायझेशन, वर्गीकरण व विश्लेषण सोपे करतो. प्राचीन हस्तलिखिते, शिलालेख, नोंदी व साहित्य यांचे जतन व अभ्यास AI मुळे अधिक परिणामकारक झाला आहे. इतिहास संशोधनाच्या पारंपरिक पद्धतींना आधुनिक संगणकीय दृष्टिकोन प्राप्त झाला आहे. मात्र डिजिटल साधनांचा वापर करताना मानवी विवेक व चिकित्सक दृष्टीकोन जपणे आवश्यक आहेत.

**AI व उपेक्षित इतिहास :**

पारंपरिक इतिहासलेखनात राजे, सत्ताकेंद्रे व अभिजन वर्ग यांनाच प्राधान्य दिले गेले. परिणामी दलित, आदिवासी, स्त्रिया व स्थानिक समुदायांचा इतिहास दुर्लक्षित होत गेला.  या उपेक्षित समूहांच्या इतिहासाचे पुनर्लेखन करण्याची नवी संधी AI प्राप्त करून देते. मौखिक परंपरा, लोकगीते, स्थानिक दस्तऐवज व अप्रकाशित साधनांचे डिजिटलीकरण करून AI त्यांच्या अनुभवांचे विश्लेषण करू शकते. त्यामुळे इतिहास अधिक समावेशक व बहुस्वरात्मक बनतो. परंतु डेटाची निवड व अर्थलागू करताना संशोधकाची सामाजिक जाण महत्त्वाची ठरते.

**AI व भारतीय ज्ञानपरंपरा :**

भारतीय ज्ञानपरंपरा अत्यंत समृद्ध व बहुआयामी आहे. वेद, उपनिषद, बौद्ध व जैन साहित्य, स्मृतीग्रंथ तसेच लोकपरंपरा यांचे जतन व अभ्यास करण्यासाठी अलीकडे AI उपयुक्त ठरते. हस्तलिखितांचे डिजिटलीकरण, भाषांतर व आशय विश्लेषण या प्रक्रिया AI मुळे सुलभ झाल्या आहेत. यामुळे विसरलेले ज्ञान पुन्हा प्रकाशात येऊ शकते. मात्र भारतीय तत्त्वज्ञानातील सूक्ष्म ज्ञान समजून घेण्यासाठी सांस्कृतिक संदर्भांची समज असणे अत्यावश्यक आहे, जे मानवी अभ्यासाशिवाय शक्य होऊ शकत नाही.

**AI व Post-Humanism :**

Post-Humanism ही संकल्पना मानवकेंद्रित विचारसरणीपलीकडील असून AI च्या उदयानंतर मानव व यंत्र यांचे नाते नव्या क्षितिजावर पोहोचले आहे. इतिहासाच्या अभ्यासात AI केवळ साधन न राहता सह-विश्लेषक म्हणून उपयोगी पडतो. यामुळे मानवी अनुभव, स्मृती व निर्णय प्रक्रियेचे स्वरूप बदलत आहे. Post-Humanist दृष्टीकोनातून ऐतिहासिक मानव व AI सहअस्तित्वाचे सामाजिक व तात्त्विक परिणाम समजण्यास मदत प्राप्त होते. मात्र, मानवी मूल्ये व नैतिकता केंद्रस्थानी ठेवणे अत्यावश्यक ठरते.

**AI : भविष्यकालीन दृष्टिकोन :**

AI ही भविष्यातील मानवी समाजाच्या रचनेवर खोलवर प्रभाव टाकणारे तंत्रज्ञान ठरणार आहे. इतिहास संशोधन, शिक्षण, आरोग्य, प्रशासन व संस्कृती या सर्व क्षेत्रांमध्ये AI मुळे कार्यपद्धती अधिक सुस्पष्ट व वेगवान होणार आहेत. मानव्यशास्त्राच्या दृष्टीने AI मानवी स्मृतीचे जतन, ऐतिहासिक विश्लेषण व ज्ञाननिर्मितीची नव दालने उघडते. परंतु भविष्यात AI चा विकास मानवकेंद्रित, नैतिक व मूल्याधिष्ठित राहणे आवश्यक आहे. तांत्रिक प्रगतीबरोबर मानवी विवेक, सहानुभूती व सामाजिक जबाबदारी जपली गेली तरच AI मानवजातीसाठी दीर्घकाळासाठी उपयुक्त ठरेल.

**AI : भारतीय व जागतिक विश्लेषण :**

जागतिक पातळीवर AI ही ज्ञानवर आधारित अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू बनत आहे. अमेरिका, युरोप व चीन यांसारख्या देशांमध्ये AI चा वापर इतिहास संशोधन, डिजिटल मानव्यशास्त्र व सांस्कृतिक वारसा जतनासाठी मोठ्या प्रमाणावर होत आहे. जागतिक संदर्भात AI माहिती विश्लेषणाचे प्रभावी साधन म्हणून उदयास आल्याने ती मानव्यशास्त्राला नवदिशा व दृष्टिकोन प्रदान करते.

भारतीय संदर्भात AI चा विकास सांस्कृतिक विविधता, भाषिक समृद्धी व प्राचीन ऐतिहासिक परंपरांशी निगडित आहे. भारतात हस्तलिखिते, शिलालेख, लोकस्मृती व मौखिक इतिहासाच्या अभ्यासात AI मदतगार ठरत आहे. परंतु भारतीय सामाजिक वास्तव, नैतिक मूल्ये व सांस्कृतिक संवेदनशीलता लक्षात घेऊनच AI चा वापर करणे आवश्यक आहे. भारतीय व जागतिक समन्वयातूनच AI संतुलित व मानवकेंद्रित भविष्य बनवू शकते.

**AI चे यश आणि अपयश :**

डेटा-आधारित निर्णय क्षमता, कार्यक्षमता, मानवी चुका कमी करणे आणि डिजिटल समाजातील नवकल्पना, आरोग्य, शिक्षण, आणि संशोधन, अशा विविध क्षेत्रात AI ने परिणामकारक सुधारणा घडून आणल्याने ते AI च्या यशाची मुख्य कारणे ठरत आहेत . मात्र, सामाजिक पूर्वग्रह, नैतिक समस्या, मर्यादित सर्जनशीलता आणि मानव अनुभवांचे अचूक अनुकरण AI करू शकत नसल्याने ते अपयशाचे कारण बनते. AI ची क्षमता असीमित असली तरी मानवी मूल्ये, नैतिकता आणि सामाजिक सांस्कृतिक संदर्भ यावर AI चे परिणाम आणि यश अवलंबून आहे.

**AI : मानव्यशास्त्राचे प्रतिबिंब/आरसा :**

AI ही आधुनिक तंत्रज्ञानाची महत्त्वपूर्ण देणगी असली, तरी तिचे स्वरूप पूर्णतः मानव्यशास्त्राशी निगडित आहे. मानव्यशास्त्र हे मानवाचा इतिहास, संस्कृती, मूल्ये, नैतिकता व सामाजिक अनुभव यांचा अभ्यास करते, तर AI ही मानवानेच निर्माण केलेली बौद्धिक रचना मांडते. त्यामुळे AI कडे मानव्यशास्त्राचा आरसा म्हणून पाहल्या जाते. AI चा विकास मानवी विचारसरणीच्या उत्क्रांतीचेच प्रतिबिंब असल्याचे ऐतिहासिक दृष्टीने स्पष्ट होते. प्रारंभी मानवाने स्मृती जतन करण्यासाठी लिखित साधने वापरली, पुढे मुद्रणकला व संगणकाचा वापर केला. अलीकडे AI चा वापर मानवी स्मृतीची विस्तारित डिजिटल संकल्पना ठरली.

AI मध्ये वापरले जाणारे अल्गोरिदम, डेटा व निर्णयप्रक्रिया या सर्व मानवी अनुभवांवर आधारित असल्यामुळे समाजातील मूल्ये, पूर्वग्रह, सांस्कृतिक दृष्टीकोन यांचे प्रतिबिंब त्यामधून दिसून येते. एकीकडे इतिहास संशोधनात AI प्राचीन दस्तऐवजांचे विश्लेषण, भाषांतर व पुनर्रचना करते. मात्र दुसरीकडे मानवी संवेदना व नैतिक निर्णयांचा अभाव AI मध्ये आढळून येतो. म्हणूनच AI ही स्वतंत्र बुद्धी नसून मानवी ज्ञानाची परावर्तित प्रतिमा आहे. या अर्थाने AI हे मानव्यशास्त्राचे तांत्रिक नव्हे, तर ऐतिहासिक व वैचारिक प्रतिबिंब/आरसा असल्याचे स्पष्ट होते.

**AI चे ऐतिहासिक संभाव्य धोके :**

1. AI मुळे इतिहास लेखनाचे यांत्रिकीकरण होत आहेत. परंतु मानवी संवेदना, सहानुभूती व विवेक यांचा अभाव निर्माण होण्याचा गंभीर धोका सुद्धा निर्माण होत आहेत.
2. प्रशिक्षण डेटामधील सांस्कृतिक, वैचारिक व सामाजिक पक्षपात इतिहासाच्या मांडणीवर विपरीत व दिशाभूल करणारा परिणाम AI करू शकतो.
3. नैतिक मूल्यांचा विचार न करता AI चा वापर केल्यास इतिहासाचे मानवीकरण कमी होऊन त्याची सामाजिक व सांस्कृतिक समज विकृत होण्याची शक्यता असते.
4. AI वर अतिविश्वास ठेवल्यास पारंपरिक इतिहासकारांची भूमिका दुय्यम होऊन AI वरील अवलंबित्व वाढण्याचा धोका निर्माण होतो.
5. अपूर्ण, चुकीच्या किंवा फेक डेटावर आधारित निष्कर्ष इतिहासाच्या चुकीच्या पुनर्रचनेस कारणीभूत ठरू शकतात.

6. ऐतिहासिक संदर्भ, कालसुसंगतता व सामाजिक पार्श्वभूमी समजण्यात AI ला मर्यादा असल्यामुळे संदर्भभ्रंश व अर्थविकृती होण्याची शक्यता असते.
7. AI आधारित इतिहास लेखनामुळे सत्ताकेंद्रित विचारसरणी, अंतर्भूत पूर्वग्रह व डिजिटल अवलंबित्व वाढून मानवी स्मृती व सामूहिक अनुभवांचे विकृतीकरण होऊ शकते.

**AI च्या ऐतिहासिक उपाययोजना व सूचना :**

1. इतिहासकार व AI यांचा समन्वयात्मक आणि परस्परपूरक दृष्टिकोन इतिहास संशोधनात स्वीकारणे अत्यावश्यक आहे.
2. AI चा विकास व उपयोगासाठी स्पष्ट नैतिक चौकट, मूल्याधिष्ठित मार्गदर्शक तत्त्वे व जबाबदार यंत्रणा निश्चित केली पाहिजे.
3. सांस्कृतिक, भाषिक व भौगोलिक स्रोतांच्या विविधतेचा समावेश करून डेटामधील पक्षपात कमी करण्यासाठी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे.
4. AI द्वारे निघणाऱ्या ऐतिहासिक निष्कर्षांचे मानवी विवेकाच्या आधारे चिकित्सक मूल्यमापन करणे अनिवार्य आहेत.
5. ऐतिहासिक पारदर्शक डेटा, विश्वसनीय स्रोत, गोपनीयता व डेटा सुरक्षितता यांच्या नियमांवर पारदर्शक लक्ष देणे आवश्यक आहे.
6. AI प्रशिक्षण प्रक्रियेत मानव्यशास्त्रीय मूल्ये, सामाजिक संवेदना व विविधता या तत्त्वांचा समावेश केला पाहिजे.
7. शैक्षणिक व संशोधन संस्थांनी AI वापरावर नियंत्रण ठेवून योग्य मार्गदर्शन व धोरणात्मक देखरेख करण्याची भूमिका पार पाडायला हवीत.
8. इतिहास लेखन व संशोधन प्रक्रियेत AI ला स्वतंत्र निर्णयकर्ता न मानता फक्त सहाय्यक साधन म्हणून मर्यादितरित्या उपयोग करायला हवा.
9. AI च्या सामाजिक व ऐतिहासिक परिणामांचे सदैव मूल्यमापन करणे व आवश्यक सुधारणा करणे तर शिक्षण-प्रशिक्षणाद्वारे समाजात AI विषयी जागरूकता निर्माण करणे ही काळाची गरज आहे.

**निष्कर्ष (Conclusion) :**

कृत्रिम बुद्धिमत्ता ही मानव्यशास्त्राचे प्रभावी प्रतिबिंब/आरसा असून मानवी ज्ञान, स्मृती, अनुभव व सांस्कृतिक मूल्यांचे डिजिटल रूप म्हणून उदयास आलेली आहेत. इतिहास संशोधनाच्या क्षेत्रात AI मुळे माहिती संकलन, विश्लेषण आणि तुलनात्मक अभ्यास अधिक सुस्पष्ट, व्यापक व वेगवान बनला आहे. परंतु नैतिकता, सांस्कृतिक संवेदनशीलता आणि मानवी विवेक यांचा विचार न करता AI चा वापर केल्यास इतिहास लेखनात पक्षपात व विकृती निर्माण होण्याची दाट शक्यता असते. AI मानवी इतिहासकाराची जागा घेऊ शकत नसून फक्त एक प्रभावी सहाय्यक साधन म्हणूनच उपयुक्त ठरते. मानवी संवेदना, सहानुभूती आणि मूल्याधिष्ठित निर्णय हे इतिहास लेखनाचे मूलभूत आधार आहेत. त्यामुळे AI आणि मानव्यशास्त्र यांचा समन्वय मानवकेंद्रित, नैतिक

आणि जबाबदार ज्ञाननिर्मितीस पोषक ठरू शकतो. AI चा विवेकपूर्ण व नियंत्रित वापर केल्यास इतिहास संशोधनासाठी निश्चितच उपयोगी ठरेल.

**संदर्भ (Reference) :**


- Carr, E. H. (1961). What is history? London, UK: Penguin Books.
- Turing, A. M. (1950). Computing machinery and intelligence. Mind, 59(236), 433–460.
- Boden, M. A. (2016). AI: Its nature and future. Oxford, UK: Oxford University Press.
- Bhat, R. (2020). "Artificial Intelligence and Humanities." Journal of Digital Humanities.
- कोसंबी, दा. द. (2007). भारतीय इतिहासाचे नवदृष्टीकोन. पुणे: राजहंस प्रकाशन.
- देशमुख, श. गो. (2015). इतिहासलेखन आणि समाज. नागपूर: कॉन्टिनेंटल प्रकाशन.
- कुलकर्णी, म. रा. (2018). मानव्यशास्त्र : संकल्पना आणि विकास. औरंगाबाद: मेहता पब्लिशिंग हाऊस.
- सावरकर, वि. दा. (2012). इतिहास आणि राष्ट्रीय स्मृती. मुंबई: लोकप्रिय प्रकाशन.
- चतुर्वेदी, रमेश. (2017). इतिहास दर्शन. वाराणसी: चौखंबा प्रकाशन.